पाकोळी

तारेवर बसलेल्या
पण फुलांची फांदी समजून
बसलेल्या पाकोळीला
परत नव्या आकाशात
सोडायचय!
कसोटीचा क्षण!
पाकोळीला अलगद
चिमटीत ~~पकडायचय~~ धरायची
पुन्हा नव्या आकाशात सोडायची
जमेल का सर्व?
रंगही दुखवायचा नको
घाई केली तर...
तारेत पंख अडकून
फाटून जातील ना
नको फाटायला
जमेल का हे सर्व?

सौ. गौरवर्णा डगांवकर



